
# लाल किल्ल्याजवळ मेट्रो स्टेशनजवळ स्फोट




दैनिक

# आपला विदर्भ


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 98 ■ मंगळवार, दि. 11 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




## अकरा जणांचा मृत्यू



# दिल्ली हादरली

## आगीचे लोट, वाहनं चक्काचूर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ एक मोठा स्फोट  झाल्याची माहिती समोर आली आहे. लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ एक कार उभी होती, त्या कारमध्ये स्फोट झाल्याची माहिती आहे. या स्फोटामुळे आजूबाजूच्या तीन गाड्यांना आग लागल्याची घटना घडली. या स्फोटात काही जणांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. हा स्फोट नेमका कशामुळे झाला, त्यामागचं कारण काय याचा तपास केला जात आहे. सोमवारी सायंकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी हा स्फोट झाल्याची माहिती आहे. त्यानंतर लगेचच फायर ब्रिगेड या ठिकाणी पोहोचलं आणि त्यांनी मदत कार्य सुरू केलं. ज्या ठिकाणी हा स्फोट झाला ते ठिकाण लाल किल्ल्यापासून फक्त ८०० मिटर अंतरावर आहे. त्यामुळे या स्फोटाकडे संशयाच्या नजरेतून पाहिलं जात आहे.**

लाल किल्ल्याचा हा परिसर म्हणजे नेहमीच गजबजलेला असतो. विशेषतः सायंकाळच्या सुमारास या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी जमते. अशावेळी हा स्फोट झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. यामध्ये काही जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे तर अनेकजण जखमी झाल्याची माहिती आहे.

या स्फोटानंतर लाल किल्ला परिसर तातडीने रिकामा करण्यात आला. सुरक्षा यंत्रणांनी या परिसराचा ताबा घेतला आहे. त्यानंतर एनएसजीचे वरिष्ठ अधिकारी या ठिकाणी पोहोचले आहेत. लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक एक जवळ पार्किंमध्ये असलेल्या कारमध्ये हा स्फोट झाला आहे. या घटनेनंतर दिल्लीमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

गेल्या चार दिवसात, ७ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर या दरम्यान दिल्ली पोलिसांनी कारवाई करत काही संशयितांना पकडले आहे. त्यामध्ये आयसिसच्या चार दहशतवाद्यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात स्फोटकंही जप्त करण्यात आलं आहे. त्याच पार्श्र्वभूमीवर लाल किल्ल्याजवळ झालेल्या या स्फोटामुळे संशय अधिक बळावला आहे.



## संपूर्ण दिल्लीसह मुंबईमध्ये हाय अलर्ट जारी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ मोठा स्फोट झाला असून त्यामुळे दिल्ली हादरल्याचं दिसून आलं. त्यामध्ये आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दिल्लीतील या स्फोटानंतर संपूर्ण दिल्लीमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच मुंबईसह देशातील प्रमुख शहरांमध्येही हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर एक जवळ पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका कारमध्ये हा स्फोट झाला. सुरुवातीला हा सिलेंडरचा स्फोट असल्याचं काही जणांना वाटलं. पण त्यानंतर हा स्फोट गंभीर असल्याचं समोर आलं. ज्या ठिकाणी हा स्फोट झाला ते ठिकाण लाल किल्ल्यापासून फक्त ८०० मीटर अंतरावर आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी हा संपूर्ण परिसर रिकामा केला. या ठिकाणी अग्नीशमन दल पोहोचलं असून लागलेली आग आटोक्यात आणण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. तसेच या ठिकाणी एनएसजीचे वरिष्ठ अधिकारीही दाखल झाले आहेत. त्याचसोबत फॉरेन्सिक टीमही या ठिकाणी दाखल झाली असून ते पुरावे गोळा करण्याचं काम करत आहेत. गेल्या चार दिवसात, म्हणजे ७ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर या दरम्यान दिल्लीमध्ये काही दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये झालेल्या या स्फोटाकडे गांभीर्याने पाहिलं जात आहे.

दिल्लीमध्ये झालेल्या या स्फोटानंतर संपूर्ण दिल्लीमध्य हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्याचसोबत आर्थिक राजधानी मुंबईमध्येही हाय अलर्ट जारी करण्यात आलं आहे.

## दिल्ली स्फोटानंतर अमित शाह ॲक्शन मोडवर, गुप्तचर प्रमुख, पोलीस कमिशनरांना फोन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**संपूर्ण देशाला हादरवणारी घटना दिल्लीमध्ये घडली असून लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ मोठा स्फोट झाला आहे. या स्फोटामध्ये आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला असून मृतांच्या आकडेवारीत वाढ होण्याची शक्यता आहे. या हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुप्तचर विभागाचे प्रमुख आणि दिल्ली पोलीस आयुक्तांशी फोनवरून चर्चा केली. त्याचसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही अमित शाहांची चर्चा केल्याची माहिती आहे.




नवी दिल्लीतील लाल किल्ला परिसरात असलेल्या मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ हा स्फोट झाला. या ठिकाणच्या पार्किमध्ये उभ्या असलेल्या कारमध्ये सायंकाळी ६ वाजून ५२ मिनिटांनी हा स्फोट झाला. त्यानंतर हा संपूर्ण परिसर रिकामा करण्यात आला असून दिल्लीमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दिल्लीमध्ये झालेल्या स्फोटानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी गुप्तचर खात्याच्या प्रमुखांशी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी दिल्लीचे पोलीस

>> पान २

## हा साधासुधा नाही तर शक्तिशाली स्फोट, घटनेची चौकशी सुरु, दिल्ली पोलिस आयुक्तांची पहिली प्रतिक्रिया समोर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाची राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळील परिसरात एका कारमध्ये स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. संध्याकाळी ६ वाजून ५२ मिनीटांच्या आसपास ही घटना घडली आहे. यामध्ये आत्तापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. तर अनेकजण जखमी झाले आहेत. घटनास्थळावरून आठ मृतदेह एलएनजेपी रुग्णालयात आणण्यात आले. ज्यावेळी स्फोट झाला ती वेळ गर्दीची असते. स्फोटाचे नेमके ठिकाण लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट १ जवळ आहे. दरम्यान, या घटनेबाबत दिल्ली पोलिस आयुक्त सतीश गोलचा यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या घटनेची बारकाईने चौकशी केली जात आहे. हा साधासुधा स्फोट नसल्याची माहिती  दिल्ली पोलिस आयुक्त सतीश गोलचा यांनी दिली आहे. स्फोट इतका शक्तिशाली होता की त्यामुळे घबराट निर्माण झाली आहे.




## रुपाली पाटील ठोंबरे अनब अमोल मिटकरींची
# राष्ट्रवादीच्या प्रवक्तेपदावरुन हकालपट्टी

## अजित पवारांचा मोठा निर्णय, नव्या प्रवक्त्यांची यादी जाहीर!

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वादग्रस्त वक्तव्यं करुन स्वत:च्या पक्षाची कोंडी करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अमोल मिटकरी आणि रुपाली ठोंबरे-पाटील यांची प्रवक्तेपदावरुन हकालपट्टी करण्यात आली आहे. अमोल मिटकरी यांच्या वक्तव्यांमुळे महायुतीमध्ये सातत्याने तणाव निर्माण होताना दिसत होता. तर रुपाली पाटील ठोंबरे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यावर तिखट आणि शेलक्या भाषेत टीका केली होती.




फलटणमधील डॉक्टर तरुणीच्या आत्म हत्याप्रकरणावरुन रुपाली ठोंबरे यांनी आपल्याच पक्षाच्या रुपाली चाकणकर यांना लक्ष्य केले होते. त्यामुळे रुपाली ठोंबरे पाटील यांना कारणे दाखवा नोटीसही पाठवण्यात आली होती. त्यानंतर रुपाली ठोंबरे पाटील यांनी अजित पवार यांचीही भेट घेतली होती. ही भेट होऊन काही तास उलटत नाही तोच रुपाली ठोंबरे पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्तेपदावरुन हकालपट्टी करण्यात आली आहे. याशिवाय, वैशाली नागवडे आणि संजय तटकरे यांना देखील प्रवक्ते पदावरून हटवण्यात आले आहे. तर मध्यंतरी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना मारहाण केल्यामुळे पायउतार व्हावे लागलेल्या सुरज चव्हाण यांची पुन्हा एकदा प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावर अमोल मिटकरी आणि रुपाली ठोंबरे पाटील काय प्रतिक्रिया देतात, हे पाहावे लागेल.

नेमकं प्रकरण काय?

फलटण येथील डॉक्टर तरूणीच्या आत्महत्या प्रकरणांमध्ये चाकणकर यांनी तरुणीचं चारित्र्यहनन केलं असल्याचा आरोप करत रुपाली ठोंबरे यांनी चाकणकर यांच्यावर टीका केली होती. या दोन्हीही पक्षाच्या महिला नेत्यांमध्ये सुरू असलेल्या वादाची दखल राष्ट्रवादी पक्षाकडून घेण्यात आली होती. सदर प्रकरणाबाबत पक्षाचे संघटक सरचिटणीस संजय खोडके रूपाली ठोंबरे यांना ही नोटीस पाठवली होती. या नोटीसमध्ये आपणास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश प्रवक्ते पदाची

>> पान २

## शिक्षण दिन ; मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्मदिन

आज ११ नोव्हेंबर आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो कारण आजच्याच दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षण मंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात ''मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.'' १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २३ फ ेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

# मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची बिनविरोध निवड

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केलेल्या सर्वांनी उमेदवारी अर्ज मागं घेतल्यानं अजिंक्य नाईक यांचा मार्ग मोकळा झाला. अजिंक्य नाईक पुन्हा एकदा अध्यक्ष बनले आहेत. जितेंद्र आव्हाड, प्रसाद लाड, मिलिंद नार्वेकर, शाह आलम शेख, डायना एडलजी, विहंग सरनाईक आणि सूरज सामंत यांनी अर्ज भरला होता. मात्र, या सर्वांनी उमेदवारी अर्ज मागं घेतल्यानं अजिंक्य नाईक बिनविरोध अध्यक्ष झाले आहेत. आता मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव आणि खजिनदार या पदांसाठी निवडणूक होणार आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्षपदी असताना अमोल काळे यांचं निधन झाल्यानं अजिंक्य नाईक अध्यक्ष झाले होते. अजिंक्य नाईक आता पुन्हा एकदा बिनविरोध अध्यक्ष झाले आहेत. अजिंक्य नाईक २३ जुलै २०२४ रोजी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सर्वात तरुण अध्यक्ष बनले होते. नाईक यांनी वयाच्या ३८ व्या वर्षी अध्यक्ष होण्याचा बहुमान मिळवला होता. त्यावेळी अजिंक्य नाईक यांनी संजय नाईक यांचा पराभव करत विजय मिळवला होता.

अजिंक्य नाईक यांचं शालेय शिक्षण दादरच्या राजा शिवाजी विद्यालयात झालं. त्यांनी पदवीचं शिक्षण रुपारेल कॉलेजमधून घेतलं. तर, मुंबई विद्यापीठातून एमबीए पूर्ण केलं.

अजिंक्य नाईक याची मंबई क्रिकेट असोसिएशनमधील कारकीर्द

२०१९ –२०२२ – कार्यकारिणी सदस्य

२०२२– २०२४– सचिव

२०२४– २०२५– मुंबई क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष

उपाध्यक्षपदासाठी जितेंद्र आव्हाड– नवीन शेट्टी यांच्यात सामना

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या उपाध्यक्षपदासाठी डायना एडलजी, जितेंद्र आव्हाड, मिलिंद नार्वे कर, नवीन शेट्टी, प्रसाद लाड, राजदीपकुमार गुप्ता, शहाआलम शेख, सूरज सामंत, विहंग सरनाईक यांनी अर्ज केले होते. त्यापैकी जितेंद्र आव्हाड आणि नवीन शेट्टी यांनी अर्ज कायम ठेवले. इतर उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यानं मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या उपाध्यक्षपदासाठी जितेंद्र आव्हाड आणि नवीन शेट्टी यांच्यात लढत होईल.

अजिंक्य नाईक यांच्याविरोधात कोर्टात याचिका दाखल केली होती त्या शाह आलम शेख यांनी अध्यक्ष, उपाध्यक्ष पदाचा अर्ज माघारी घेतला. शाह आलम शेख यांनी सेक्रेटरी पदाचा अर्ज ठेवला आहे. अध्यक्षपदासाठी अर्ज अजिंक्य नाईक यांना भरता येणार नाही असं त्यांच म्हणणं होतं.

अजिंक्य नाईक बिनविरोध, चार जागांसाठी निवडणूक

१) अध्यक्ष– अजिंक्य नाईक– बिनविरोध

२) उपाध्यक्ष– जितेंद्र आव्हाड विरुद्ध नवीन शेट्टी

३) सचिव– शाह आलम शेख विरुद्ध डॉ उन्मेष खानविलकर

४) सहसचिव – गौरव पयाडे विरुद्ध निलेश भोसले

५) खजिनदार – अर्मान मलिक– सुरेंद्र शेवाळे

एमसीए हे एक कुटुंब : अजिंक्य नाईक

अजिंक्य नाईक यांनी अध्यक्ष झाल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमचे प्रमुख शरद पवार यांच्यामुळे पुन्हा एकदा संधी मिळाली असं सांगितलं. ही निवडणूक बिनविरोध झाली आहे. चउ– हे एक कुटुंब आहे. भांडण होतं असतात निवडणुका होतं असतात आम्ही सर्व मिळून काम करू असं अजिंक्य नाईक म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांनी नवीन वानखेडे



स्टेडियम बाबत सुतोवाच केले होते. त्यानुसार नक्कीच आम्ही करू असं अजिंक्य नाईक म्हणाले.

भाजप आमदार प्रसाद लाड यांनी प्रसाद लाडला ग्लॅमरची गरज नाही. तो जिथ उभा राहतो तिथ ग्लॅमर निर्माण होते, असं म्हटलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आशिष शेलार आणि शरद पवार यांनी मिळून एक यादी ठरवली होती त्यानुसार आम्हाला होईल असं वाटल होतं. बघूया पुढे काय होतेय, असंही लाड म्हणाले.

ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी सर्वांच्या सोबत राहायच असतं, असं म्हटलं. मी सर्व पदांसाठी अर्ज भरले होते. वरिष्ठांनी अर्ज माघारी घेण्यास सांगितले. त्यानुसार निर्णय घेतला. एकदम पुढे जायचं नसतं. हळूहळू जायच असतं. आता आमदार झालो आहे. बघूया पुढे काय करता येईल, अस नार्वेकर म्हणाले.


न्यायालयानं निर्णय राखून ठेवला

मुंबई क्रिकेट एसोसिएशनच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेल्या अजिंक्य नाईक यांच्या उमेदवारीला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणी पूर्ण झाली आहे. शहर दिवाणी न्यायालयाने निर्णय राखून ठेवला. एमसीएच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेल्या शाह आलम शेख यांनी अजिंक्य नाईक यांच्या उमेदवारीला आव्हान दिलं होतं. कुलिंग पीरियडच्या नियमानुसार अजिंक्य नाईक निवडणूक लढवू शकत नसल्याचा दावा शहा आलम शेख यांचा होता. सचिव आणि अध्यक्षपद यांचा कार्यकाळात एकच असल्याने कोणत्याही नियमांच उल्लंघन झालं नसल्याचं अजिंक्य नाईक यांनी म्हटलं होतं.

## अखेर आरएसएसने मान्य केले, ''कोणत्या जाती, धर्मात जन्म घेतला यावर काहीही अवलंबून नाही'', भैय्याजी जोशींनी

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** तुम्ही जन्म कुठे घेतला, कोणत्या जातीत, धर्मात घेतला यावर काहीही अवलंबून नसते. मात्र प्रत्येकाने योग्य मार्गाने चालावे असे ईश्वराचे वरदान आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी यांनी केले. पारधी विकास परिषद विदर्भ प्रांतच्या वतीने पारधी समाजासाठी काम करणाऱ्या संस्थांची एक दिवसीय कार्यशाळा शनिवारी रवी भवन नागपूर येथे संपन्न झाली. कार्यशाळेस उद्घाटक म्हणून जोशी उपस्थित होते. तर विशेष अतिथी म्हणून अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल म ेश्राम, परिषदेचे मार्गदर्शक प्रदीप वडनेरकर, संयोजक आशिष कावळे, परशराम भोसले उपस्थित होते.



उद्घाटनपर भाषणात भैय्याजी जोशी म्हणाले की, प्रत्येक माणसाला आनंदाने जगण्याचा अधिकार आहे. मग तो दुर्बल असो, सक्षम असो, गरीब वा श्रीमंत असो. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार स्वत: आनंद घ्यावा व इतरांनाही आनंदी ठेवावे. दुर्बल घटकांना सक्षम घटकांनी सर्व प्रकारचे सहकार्य करावे. शिक्षित व अशिक्षित दोघेही पैसा मिळवू शकतात पण पैसे मिळविण्याचे मार्ग वेगवेगळे असू शकतात. त्या सर्व गोष्टींसाठी बुद्धीमत्ता व कौशल्य लागते. आता जगण्यासाठी सर्व व्यवस्था निर्माण झाल्या आहेत. पूर्वी अशा सुविधा नव्हत्या. दळणवळणासाठी वाहन, उदरनिर्वाहासाठी अनेक साधने, उद्योग, कारखाने, छोट्या मोठ्या नोकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत. त्याचा योग्य वापर व्हावा व चांगले जीवन जगावे. यासाठी सर्व सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन दुर्बल व वंचित घटकातील पारधी समाजास उन्नत करावे. त्यासाठी सेवा संस्थेतील कार्यकर्त्यांनी त्यांच्यात असलेल्या दैवी गुणांचा व कौशल्याच्या उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

धर्मपालजी मेश्राम म्हणाले, मला शासनाने वंचित समाजासाठी काम करण्याची संधी दिली. मी संपूर्ण महाराष्ट्रात फिरलो, अगदी शेवटच्या पालावर व बेड्यात गेलो. अजुनही शेवटच्या घटकांपर्यत शासनाचे लाभ पोहोचले नाहीत ही शोकांतिका आहे. हे चित्र बदलण्यासाठी व या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने व सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन प्रयत्न करावे, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप वडनेरकर यांनी केले. कार्यशाळेस विदर्भातून सामाजिक संस्थाचे ४७ प्रतिनिधी आले होते. कार्यशाळेत सामाजिक संस्थांनी आपले कार्य वृत्त सादर केले. कार्यशाळेचा समारोप अतुल मोघे यांनी केला.

## अंजली दमानियांना जीवे मारण्याची धमकी, गाडीत मोबाईल बंद ठेवा; अधिकाऱ्याचा फोन, दमानियांची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई/प्रतिनिधी :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांना जीवे मारण्याची धमकी आली आहे. काही विश्वसनीय सूत्रांकडे 'माझा गेम केला जाणार' अशा गंभीर स्वरूपाचे इनपुट असल्याचं त्यांनी स्वत: सांगितलं. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वत: फोन करून दमानिया यांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. याबाबतची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही देण्यात आली असून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सिक्युरिटी नाकारली आहे. अंजली दमानिया यांनी स्वत: याबाबतची माहिती देत सांगितले की,''मी अमेरिकेत असताना मला एका सीनियर अधिकाऱ्यांचा फोन आला. त्यांनी सांगितले की त्यांच्या हाताला काही इनपुट मिळाले आहेत की तुमचा गेम केला जाणार आहे. काही लोकांना वाटतंय की 'यांचा अति होतोय, यांचा गेम करायचाच', अशा प्रकारच्या चर्चा त्यांच्या कानावर आल्या आहेत.''

पान १ वरून...

## दिल्ली स्फोटानंतर अमित शाह

आयुक्तांशी चर्चा केली आणि या स्फोटाची माहिती घेतली. घटनास्थळी एनएसजीचे अधिकारीही उपस्थित आहेत. घटनास्थळी फॉरेन्सिक टीम पोहोचली असून त्यांनी पुरावे गोळा करण्यास सुरूवात केली आहे.

हा स्फोट लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ झाला. हे मेट्रो स्टेशन लाल किल्ल्यापासून फक्त ५०० मीटर अंतरावर असल्याची माहिती आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये दिल्लीमध्ये असे लहान-लहान स्फोट झाले असून ते सर्व लाल किल्ला परिसरात झाल्याची माहिती आहे.

लाल किल्ला ही देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची वास्तू असून त्या ठिकाणाहून १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान देशाला उद्देशून भाषण देतात. त्यामुळे दहशतवाद्यांच्या टार्गेटवर लाल किल्ला नेहमीच राहिल्याचं दिसतंय. आताही तसाच संदेश देण्यात आला आहे का याचा तपास केला जात आहे.

लाल किल्ला परिसराचं महत्त्व लक्षात घेता या ठिकाणी दोन महिन्यांपूर्वी एक मॉक ड्रील करण्यात आला होता. त्यामध्ये काही अधिकारी संशयित वस्तू शोधण्यात अयशस्वी झाले होते. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती.

## राष्ट्रवादीच्या प्रवक्तेपदावरुन हकालपट्टी

जबाबदारी दिली असताना आपण राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष व पक्षाच्या महिलाध्यक्षा यांच्याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये केलेले वक्तव्य हे पक्षशिस्त भंग करणारे आहे, म्हणून आपल्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये याचा ७ दिवसांत रुपाली पाटील ठोंबरेंना खुलासा करण्यास सांगितले होते. त्यानंतर आज पक्षाकडून रुपाली पाटील-ठोंबरे यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या प्रवक्तेपदावरुन काढून टाकण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून नव्याने प्रवक्ते नियुक्त, कोणाला संधी?

अनिल पाटील, रुपाली चाकणकर, ब्रिजमोहन श्रीवास्तव, चेतन तुपे, आनंद परांजपे, अविनाश आदिक, सना मलिक, राजलक्ष्मी भोसले, सुरज चव्हाण, हेमलता पाटील, प्रतिभा शिंदे, विकास पासलकर, राजीव साबळे, प्रशांत पवार, श्याम सनेर, सायली दळवी , शशिकांत तरंगे

## आमदार निधीतून स्वत:च्याच शिक्षण संस्थेला ३२ लाखांच्या रुग्णवाहिका दिल्या

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** शिंदे सरकारच्या काळात वादग्रस्त वक्तव्यांमुळे आणि गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे सातत्याने चर्चेत राहिलेले शिवसेना आमदार अब्दुल सत्तार हे पुन्हा एकदा अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. २०१४ सालच्या एका प्रकरणामुळे अब्दुल सत्तार हे पुन्हा गोत्यात आले आहेत. अब्दुल सत्तार यांनी मंत्री असताना प्रत्येकी १६ लाख रुपयांच्या दोन रुग्णवाहिका विकत घेतल्या होत्या. यासाठी अब्दुल सत्तार यांनी स्वत:च्या आमदार निधीचे पैसे वापरले होते. मात्र, या दोन्ही रुग्णवाहिका अब्दुल सत्तार यांच्या प्रगती शिक्षण संस्थेला देण्यात आल्या होत्या. यावरुन प्रचंड वादंग निर्माण होऊन हे प्रकरण न्यायालयात गेले होते. याप्रकरणी आता न्यायालयाने छत्रपती संभाजीनगर पोलिसांना तपास करुन याप्रकरणाचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे अब्दुल सत्तार यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर हे निर्देश देण्यात आल्याने अब्दुल सत्तार यांची राजकीय कोंडी होण्याची शक्यता आहे.

### अब्दुल सत्तार अडचणीत, न्यायालयाकडून महत्त्वाचे निर्देश



शासकीय नियमानुसार, कोणतेही खासगी रुग्णालय किंवा संस्थेला सरकारी पैशाने रुग्णवाहिका देता येत नाहीत. मात्र, अब्दुल सत्तार यांनी हा नियम धाब्यावर बसवला. त्यांनी शासनाची दिशाभूल करुन सरकारी संपत्तीचा अपहार केला. शासनाची कोणतीही परवानगी न घेता या व्यवहाराला मंजुरी देण्यात आली. तसेच ज्या संस्थेला रुग्णवाहिका देण्यात आल्या, ती संस्था आपलीच आहे, ही बाबही अब्दुल सत्तार यांनी लपवली. याविरोधात गणेश शंकरपल्ली यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. मात्र, पोलिसांनी त्यावर कोणतीही कारवाई केली नव्हती. त्यामुळे गणेश शंकरपल्ली यांनी सिल्लोड न्यायालयात धाव घेतली होती. अखेर न्यायालयाने आता याप्रकरणात पोलिसांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या अहवालात पोलीस काय माहिती देणार, हे पाहावे लागेल. मात्र, या अहवालात एखादी नकारात्मक टिप्पणी असल्यास ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर अब्दुल सत्तार यांच्या अडचणी वाढू शकतात, अशी कुजबुज राजकीय वर्तुळात रंगली आहे.

काही दिवसांपूर्वी सिल्लोड नगरपरिषदेच्या मतदार यादीत हेरफेरी असल्याचा आरोप करत भाजपने अब्दुल सत्तार यांच्याविरोधात आंदोलन केले होते. आमदार अब्दुल सत्तार हे गेल्या निवडणुकीत मयत झालेल्या लोकांच्या मतदानावर निवडून आले आहेत. जे मेलेले लोक होते, त्यांच्या नावावर त्यांनी मतदान करून घेतले. 'मरेल माणसावर निवडून आलेला आमदार तो म्हणजे अब्दुल सत्तार', अशी टीका स्थानिक भाजप नेत्यांनी केली होती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# विश्वधर्मी मानवता तीर्थभवनातून निघणारा संदेशच जगाला विनाशापासून वाचवेल : डॉ. विश्वनाथ कराड

## विश्वशांतीची महागाथा व सुवर्णपिंपळ ग्रंथाचे प्रकाशन

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय संस्कृतीचे वसुधैव कुटुंबकम् व एकं सत् विप्रा बहुदा वदंती हा संदेशच जगाला विनाशापासन वाचवू शकतो. हाच संदेश रामेश्वर रूई येथे साकारलेल्या एकमेवाद्वितीय अशा 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा छोटासा प्रयत्न आहे. विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातूनच जगात शांती नांदेल अशी श्रध्दा आणि पूर्ण निष्ठा आहे. असे विचार विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.



विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर रुई यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात' लेखक लक्ष्मण सूर्यभान घुगे यांच्या लेखणीतून विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्माची प्रयोगशाळा या संकल्पनेवर आधारीत 'विश्वशांतीची महागाथा' व संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या संघर्षमय जीवनाचं सुंदर आख्यान महाकादंबरी 'सुवर्णपिंपळ' या ग्रंथांचे प्रकाशन विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रगतशील शेतकरी काशीराम दा. कराड, डॉ. हनुमंतराव कराड, वरिष्ठ सल्लागार गिरीश दाते, संचालक डॉ. महेश थोरवे, डॉ. राऊत आणि योगेश पारखी उपस्थित होते.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, सध्या संपूर्ण जगात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्व सुख सुविधांसह झालेली पराकोटीची भौतिक प्रगती असूनसुद्धा दुसरीकडे हिंसा, रक्तपात, द्वेष, गोंधळ, अराजकता, जातीधर्मातील तेढ, देशांच्या सीमा या सारख्या क्षुल्लक कारणांमुळे अत्यंत संशय, भिती व तणावाचे वातावरण निर्माण झालेले दिसून येते. आशा वेळेस रामेश्वर रुई येथे उभारण्यात आलेल्या विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनातून संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देण्यात येत आहे.

गिरीश दाते म्हणाले, विज्ञानाच्या पायावर उभे राहून अध्यात्माचा दिवा पेटवणारे विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी ज्ञानेश्वर माऊलींच्या विचारांना स्वामी विवेकानंदांच्या तत्वधारेचा शेला बांधून विश्वशांती महायज्ञाचा आरंभ केला. त्यांनी विज्ञानाच्या शक्तिरूप हातात अध्यात्माच्या हृदयातला करुण रस सोपवला आहे. यातून विश्वशांती घडावी हे त्यांचे स्वप्न आता सत्यात उतरतांना दिसत आहे.

डॉ. महेश थोरवे म्हणाले, विश्वशांती या संकल्प यात्रेचे शांतीदूत म्हणजे विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड आहेत. त्यांचा एकूणच प्रवास ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्म या तत्वमालेशी संवाद साधणारा आहे. त्यांनी रामेश्वर रुई या जन्मगावी बौद्ध विहार, मुस्लिम बांधवांसाठी मशीद उभारली, रामसेतू बांधला तसेच आता विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची उभारणी केली आहे. त्यांचे हे कार्य अद्वितीय आहे.

लेखक लक्ष्मण सूर्यभान घुगे म्हणाले,जग हे तंत्रज्ञानाच्या वेगाने एक विशिष्ट मार्गावरुन धावत आहे. याच महामार्गावरून प्रवास करताना प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी या वेगाला दिशा देणारा आत्मा नेमका कुठे आहे याचे मर्म जाणले. आयुष्यात परिवर्तन घडवून ज्ञानाची अद्भुत मंदिरं उभे केली. शिक्षण संस्था हे ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्माची प्रयोगशाळा म्हणून उभी केली. त्यांनी सर्व धर्मातल्या माणसांना माणुसकीच्या सुंदर धाग्यांनी आणि स्वर बंधाने जोडले आहे. योगेश पारखी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

## महत्त्वाचे...

### भाजपला सोबत घेऊन समीर भुजबळ शिवसेनेला हादरा देणार; नाशकात भुजबळ विरुद्ध कांदे संघर्ष पुन्हा पेटणार

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून, येवला, नांदगाव आणि मनमाड या नगरपालिकांमध्ये पुन्हा एकदा जुना समीर भुजबळ विरुद्ध सुहास कांदे संघर्ष पेटण्याची चिन्हं दिसू लागली आहेत. माजी खासदार समीर भुजबळ यांनी भाजपसोबत हातमिळवणी करण्याचे संकेत दिल्याने राजकीय समीकरणे चांगलीच तापली आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गट आणि भाजपमध्ये युतीबाबत चर्चा सुरू असून, मंत्री गिरीश महाजन आणि समीर भुजबळ यांची नाशिकमध्ये बैठक झाली आहे. या बैठकीत नगरपालिका निवडणुकीबाबत चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे भाजप आणि राष्ट्रवादीची नाशिकमध्ये युती होणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

समीर भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे की, सध्या नगरपालिका निवडणूक घोषित झाल्यात. खासकरून नांदगाव, मनमाडमधील कार्यकर्त्यांची भावना आहे की, एकत्र लढले पाहिजे. त्याचा आढावा गिरीश महाजन यांना दिला आहे. येवल्यात दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते एकत्र येण्याची मागणी करत आहेत. त्यानुसार ते त्याच्या लोकांशी बोलत आहेत. उद्या पुन्हा मुंबईमध्ये आम्ही भेटणार आहोत. येवल्यात नगराध्यक्ष पदासाठी आम्ही प्रमुख दावेदार आहोत. नगराध्यक्ष पद आम्ही घेऊ. येवला नांदगाव आमच्याकडे आणि मनमाड भाजपकडे अशी चर्चा झाली आहे. येवल्यात स्वबळावर तयारी सुरू आहे. काही लोकांची म्हणणे आहे की, भाजप सोबतच लढा. येवल्यात शिंदेंच्या शिवसेनेची ताकद नाही. नांदगाव, मनमाडमध्ये ते आमचे विरोधक आहेत. त्यामुळे त्यांना सोबत घेण्यात उपयोग नाही, असे म्हणत त्यांनी शिवसेना शिंदे गटाचे नांदगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुहास कांदे यांच्यावर निशाणा साधला.

### कथित आर्थिक फसवणूक प्रकरणात दाखल गुन्हा रद्द करा; अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्राची उच्च न्यायालयात धाव

**मुंबई/प्रतिनिधी :** शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा या दोघांनी आर्थिक फसवणूक प्रकरणात त्यांच्याविरोधात मुंबई पोलिसांनी नोंदवलेला गुन्हा रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतलीय. या याचिकेवर सोमवारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. याचिकेला उत्तर देण्यासाठी सरकारी वकिलांकडून न्यायालयाकडे वेळ मागण्यात आला. तेव्हा या याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे निर्देश राज्य सरकारला देत उच्च न्यायालयाने सुनावणी २० नोव्हेंबरपर्यंत तहकूब केली.

६० कोटी रूपयांच्या कथित आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणात मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं राज कुंद्रासह अभिनेत्री शिल्पा शेट्टीचीही चौकशी केलीय. शिल्पाच्या घरी तब्बल साडे चार तास चाललेल्या या चौकशीत शिल्पाला संबंधित व्यवहाराविषयी अनेक प्रश्न विचारून तिचा रितसर जबाब नोंदवण्यात आला. तर याच प्रकरणी राज कुंद्रा यांचीही पोलीस आयुक्तालयात जवळपास पाच तास चौकशी करून त्यांचा रितसर जबाब नोंदवलाय. हा व्यवहार झाला त्यादरम्यान कंपनीशी आपला काहीही संबंध नव्हता, आपण आपल्या पदाचाही राजीनामा दिला होता, असं शिल्पा शेट्टीनं तपास अधिकरयांना सांगितलं.

## शिक्षक व पदवीधर मतदार संघांच्या निवडणुकांसाठी मतदार नोंदणी सुरु

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पुणे, नागपूर व औरंगाबाद विभागातील पदवीधर मतदार संघ, तसेच पुणे व अमरावती विभागातील शिक्षक मतदार संघांच्या द्विवार्षिक निवडणुकांसाठी मतदार याद्या नव्याने तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पात्र पदवीधर आणि शिक्षकांकडून अनुक्रमे प्रपत्र १८ व १९ मध्ये प्राप्त झालेल्या अर्जांवर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी पात्रता-अपात्रतेचा निर्णय घेतील. त्यानुसार २५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येतील.

यानंतर २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ या कालावधीत नागरिकांना या यादीविषयी दावे व हरकती सादर करण्याची संधी मिळेल. तसेच, ६ नोव्हेंबरनंतरही पदवीधर आणि शिक्षकांना प्रपत्र १८ व १९ द्वारे मतदार नोंदणी करण्याची मुभा असेल.

१० डिसेंबर २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांवर विचार करून ३० डिसेंबर २०२५ रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.

शिक्षक आणि पदवीधर मतदार संघांसाठी ऑनलाईन नोंदणीची सुविधा देखील उपलब्ध आहे. इच्छुकांनी https://mahaelection.gov.in/Citizen/Login या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदार नोंदणीसाठी आवश्यक पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे व संबंधित माहिती या संकेतस्थळावरील "Manual" या विभागात पाहता येईल. त्यामुळे अद्याप अर्ज सादर न केलेल्या पात्र पदवीधर व शिक्षकांनी तात्काळ आपली नोंदणी करून घ्यावी, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने एका प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## अपघात रोखण्यासाठी समन्वयाने कृती करा रस्ता सुरक्षा समितीची राज्य शासनाला सूचना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश तथा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष अभय सप्रे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील रस्ता सुरक्षा उपाययोजनांबाबत उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीस मुख्य सचिव राजेशकुमार तसेच गृह, परिवहन, नगर विकास, सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक आरोग्य आणि शालेय शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

समितीचे अध्यक्ष अभय सप्रे हे दि. ९ ते १४ नोव्हेंबरदरम्यान मुंबईपुणे दौऱ्यावर असून, रस्ता सुरक्षा सुधारणा आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीत रस्ते अपघात रोखण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच ब्लॅक स्पॉट्स दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी सूचना करण्यात आली.


केंद्र सरकारच्या आयआरएडी पोर्टलचा प्रभावी वापर, आयटीएमएस, एटीएस आणि एडीटीटी प्रकल्पांची गतिमान अंमलबजावणी तसेच हेल्मेटचा अनिवार्य वापर या विषयांवरही समितीने भर दिला. सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनीही दुचाकी




चालविताना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक असल्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

तसेच जिल्हास्तरावर नियमितपणे रस्ता सुरक्षा समित्यांच्या बैठका घेऊन अपघात प्रतिबंधक उपाययोजना राबविण्याचे निर्देशही देण्यात आले. रस्ता सुरक्षा नियमांची प्रभावी अंमलबजावणी करून राज्यातील अपघात आणि अपघाती मृत्यू रोखण्याचे उद्दिष्ट असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## शब्दकोडे क्र. 06



आडवे शब्द

१. सीता ४. विश्रांती ६. शंकराचे एक नाव ८. अश्रूची चव ११. चणचण १३. छोटासा १४. वर्ष, सन १५. संभाजीराजांचे धाकटे बंधु १८. हेळसांड, दुर्लक्ष १९. मृत २१. जमीन, देश इ. २२. समुद्राचा आवाज २३. आश्चर्य २५. कोवळी फांदी २७. सांगणे २८. संपूर्ण ३१. भ्रमर ३२. एक चतुर्थांश भाग ३३. माणुसकी ३४. ढीग ३६. प्राण ३८. थाट, ऐट, झोक ४०. नृत्याचा एक प्रकार, लवून केलेला नमस्कार ४१. साडी ४२. उन्हाळी सुगंधी पांढरे फूल ४४. आरपार जाणारी (नजर) ४६. पानाचा 'मीठा' प्रकार ४८. मध्यस्थ ४९. किंमत ५०. परिचय ५२. औषध ५५. छान गरगागरम ५७. डोंगरवाट ५८. हिंदुस्तान ६०. लाकूड छिलण्याचे हत्यार ६२. पँट ६२अ. बोटावरील कडक भाग ६३. महिरप ६५. अस्थिर, हलणारे ६६. घरची जबाबदार व्यक्ती ६७. सततचे नामस्मरण ६८. चौक ६९. निकट, जवळ ७१. पत्र ७३. मोटरसायकलला मराठी शब्द ७४. गवंडी ७५. चिंचेचे दाट पाणी ७६. मत्स्य, मीन ७७. लोणच्यातील द्रव मसाला ७८. कावळा ७९. होकारच्या विरुद्ध ८०. चकचकीत ८१. पोपट ८२. आठवण

उभे शब्द

२. मंदिर ३. खालच्या दर्जाचे ५. रात्रीच्या रात्रीच ६. अनेकांनी म्हटलेले गीत ७. वर्तुळ ८. घराणे ९. फळातील द्रव १०. शेंगेचे आवरण १२. वाहणारी हवा १४. चाणक्यनीती १६. वाईजवळच्या ह्या खोऱ्यात शिवाजीराजांनी अफजल खानला ठार मारले १७. दुसऱ्याच्या मनातील भाव जाणणारा १८. पुरुष १८अ. यज्ञ, होम २०. थेट, सरळ २४. सिंह २६. जय पराजय २८. वर्ष, साल २९. नगण्य किंमत ३०. वेल, वल्लारी ३३. संपत्ती ३५. निष्णात, पटाईत ३७. सततची हालचाल ३९. टप्प्याटप्प्याने ४०. इच्छा (हिंदी) ४१. साखरेचा रस ४३. खिडकी ४५. दार ४७. केव्हा (ग्रामीण) ५०. रांग ५१. रिकाम्या तिजोरीचा आवाज ५३. मूल ५४. पुष्पदल ५६. तातातूट ५८. वजन, बोजा ५९. तात्काळ ६०. बुटका, बटु ६१. पंजाबातील एक नदी ६२. नव्वद अंशापेक्षा मोठा कोन ६४. मालाची विक्री ६८. अपशकुन ७०. ठिबकणारा ७२. संगोपन करणारा ७३. तफावत, अंतर ७४. राक्षस ७६अ. दागिना ७७. चानी

### शब्दकोडे क्र. 05 चे उत्तर

आडवे उत्तर

१.विकृत ३.शककर्ता ५.सत्र न्यायाधीश ९.नात १०.वात्सल्य ११.कच्चा १२.हार १३.विघ्नहर्ता १५.भूणभूण १६.अरी १७.पथ १८.तहहयात १९.सार २०.बरोबर २२.पूकार २४.यातायात २५.जल २६.अपूर्व २८.सहाध्यायी ३१.सपक ३३.पागा ३४.उजाड ३५.भकास ३७.रद ३८.दारवठा ४०.पुजारी ४२.जरतर ४३.साठेबाजी ४५.मात ४६.आवक ४८.तट ५०.वत ५१.पत ५२.कागाळी ५३.संतान ५५.रमा ५७.मीमांसा ५८.निकामी ५९.सागर ६०.श्री ६१.कोरकु ६३.नकार ६५.अकबार ६७.सवा ६८.गरम ६९.टापू ७०.कारस्थान ७२.राज ७३.राका ७६.काना ७७.आईजीच्या जीवावर बाईजी उदार

उभे उत्तर

१.विनाविलंब २.कृतघ्न ३.शल्य ४.कळण ५.सच्चा ६.न्याहारी ७.यार ८.शपथ १०.वार्ताहर ११.कणव १४.हतबल १५.भूतपूर्व १६.अनुयायी १७.परत परत १९.सायास २१.रोजगार २३.रसभरीत २६.अजा २७.पूड २९.हाका ३०.ध्यास ३२.कदरदान ३३.पादाक्रांत ३४.उठाठेव ३६.रजक ३९.वसा ४१.जामात ४४.बातमीदार ४६.आगामी ४७.वळी ४९.टर ५१.पसा ५२.काकाकुवा ५३.संगनमत ५४.तारका ५६.मालक ५८.निरसन ६२.मगर ६४.रजनीनाथ ६५.अपूवाई ६६.बाणा ६६अ.हर ७०.काजवा ७१.स्थावर ७२.राजी ७३.राई ७४.काजी ७५.अदा

## वृत्तविशेष...

### मठावर कारवाई झाल्याने स्वामी भक्त भडकले, महापालिकेत शिरुन केली आरती

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील २० वर्ष जुन्या स्वामी समर्थाच्या मठावर ठाणे महापालिकेने कारवाई केली आहे. या कारवाईमुळे स्वामी समर्थाच्या भक्तांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून सोमवारी स्वामी समर्थ भक्तांनी थेट महापालिका मुख्यालयात प्रवेश करुन ठाणे महापालिके विरोधात घोषणाबाजी केली. तसेच स्वामी समर्थाची आरती गायली. काहींनी महापालिकेत खाली बसून ठिय्या मांडला. त्यामुळे महापालिकेत एकच गोंधळ निर्माण झाला होता.

घोडबंदर येथील आनंदनगर भागात स्वामी समर्थाचे २० वर्ष जुने मठ आहे. हे मठ म्हाडाच्या जागेत असून अनेक वर्षापासून या जागेवरून वाद सुरु आहे. हजारो नागरिक येथे दर्शनासाठी येत असतात. येथे बालसंस्कार तसेच इतर उत्सव देखील मोठ्याप्रमाणात साजरे होतात. येथे उद्यान उभारले जाणार असल्याने येथील मठावर कारवाई करण्यास ठाणे महापालिकेने सुरुवात केली आहे.

त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) मनोज प्रधान, शिवसेना (ठाकरे गट) प्रदीप पुर्णेकर यांच्यासह विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विरोध करत सोमवारी महापालिकेवर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला होता. ही कारवाई करताना देखील महापालिकेविरोधात येथील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती.सोमवारी मोठ्याप्रमाणात स्वामी समर्थ यांचे भक्त एकत्र आले होते. त्यांच्यासोबत मनसेचे नेते अविनाश जाधव यांच्यासह इतर पक्षाचे कार्यकर्तेही होते. या सर्वांनी ठाणे महापालिकेच्या मुख्यालयात प्रवेश केला. महिलांचे प्रमाण यामध्ये अधिक होते.

### राज्याच्या राजकारणात मोठी घडामोड! अखेर राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र, महायुतीच्या मंत्र्याचा पुढाकार

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. आजपासून नगरपरिषद, नगरपंचायती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया आजपासून सुरू झाली आहे. अशातच राज्याच्या राजकारणात मोठी घडामोड झाली आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पहिल्यांदाच अजित पवार आणि शरद पवार गट एकत्र आले आहेत.

राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर दोन्ही पक्षांनी एकत्र यावे, असे दोन्ही बाजूच्या काही नेत्यांनी म्हटले होते. त्यानंतर, राष्ट्रवादी युती, एकत्रीकरणाच्या चर्चा सुरू होत्या. तर, काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादीच्या बैठकीत बोलताना शरद पवार यांनी भाजपसोबत कोणत्याही परिस्थितीत आघाडी नको, अशी सूचना केल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर आता मोठी घडामोड झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड नगर परिषदेत अनपेक्षित पण महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड घडली आहे. कुटुंबातील राजकीय विभाजनानंतर प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्र येत आघाडी जाहीर केली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गट आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांनी चंदगडमध्ये एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे.

या आघाडीची मध्यस्थी राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केली. गडहिंग्लज येथील त्यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत शरद पवार गटाच्या नंदाताई बाभुळकर आणि अजित पवार गटाचे राजेश पाटील यांच्यात चर्चा झाली. अखेर दोन्ही राष्ट्रवादी गटांनी भाजपच्या विरोधात एकत्र लढण्याचा निर्णय घेत ''शहर विकास आघाडी'' जाहीर केली.

### 'अमेडिया' कंपनीच्या कोणालाही भेटलो नाही, चुकीच्या पद्धतीने गुन्हा दाखल

**पुणे/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या 'अमेडिया' या कंपनीची तसंच पुण्यातील मुंढवा येथील कथित महार वतनाची जमीन खरेदी व्यवहार प्रकरणाची राज्यभर जोरदार चर्चा सुरू आहे. पुणे शहरातील कृषी विभागाच्या कथित जमिनीबाबत अपहार केल्याप्रकरणी तीन दिवसांपूर्वी पुण्यातील खडक पोलीस स्टेशन येथे तहसीलदार यांच्यासह ८ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेले व्यावसायिक हेमंत गवंडे यांनी पत्रकार परिषद घेत माझ्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा हा बेकायदेशीर असून, या विरोधात न्यायालयात जाणार आहे. तसंच अमेडिया कंपनीचे दिग्विजय सिंह, पार्थ पवार आणि शीतल तेजवानी यांना कधीच भेटलो नसल्याचं त्यांनी सांगितलय.

पुण्यातील पत्रकार भवन येथे व्यावसायिक हेमंत गवंडे यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी याबाबत आपली भूमिका मांडली. तसंच दाखल असलेला गुन्हा हा बेकायदेशीर असल्याचं त्यांनी सांगितलं.

आरोप असत्य, निराधार : हेमंत गवंडे म्हणाले, माझ्याविरुद्ध ०७ नोव्हेंबर रोजी जो गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तो पूर्णपणे गैरसमजुतीवर आणि चुकीच्या माहितीनुसार दाखल करण्यात आलाय. सर्व आरोप असत्य, निराधार आणि कायदेशीर आधारांविना आहेत.

# शेतीच्या वादातून रक्तरंजित हाणामारी एकाचा मृत्यू, दोन जणांची प्रकृती चिंताजनक, पाच गंभीर जखमी

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** अंजनी बु. शिवारातील शेतीच्या वादातून झालेल्या रक्तरंजित हाणामारीत एकाचा जागीच मृत्यू झाला असून दोन जणांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. या घटनेत पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. ही धक्कादायक घटना दि. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी सुमारे ४ वाजता घडली.



नागापूर येथील सैय्यद कुटुंब आणि अमडापूर व मंगरूळ नवघरे येथील शेख कुटुंब हे परस्पर नातलग असून, अंजनी बु. शिवारातील शेतीवरून दोन्ही गटांमध्ये गेल्या काही काळापासून वाद सुरू होता. या प्रकरणावरून पूर्वीही अनेक वेळा वाद होऊन तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या होत्या.

दि. १० नोव्हेंबर रोजी दोन्ही गटातील आठजण संबंधित शेतात आले असता, सुरू झालेली बोलाचाली क्षणात हाणामारीत परिवर्तित झाली. लोखंडी पाईप आणि काठ्यांचा वापर करून दोन्ही गटांनी एकमेकांवर हल्ला केला. या झटापटीत अमडापूर येथील शेख अयाज शेख वाहेद (वय ३६) याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेत रुजवानाबी जाबीर खान व जाबीर खान शब्बीर खान (रा. मंगरूळ नवघरे) हे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी बुलडाणा जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. याशिवाय पाच जण गंभीर जखमी असून त्यांनाही बुलडाण्यात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपविभागीय अधिकारी संतोष खाडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी तातडीने नागापूर येथील संभाव्य आरोपींना ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, रात्री उशिरापर्यंत डोणगाव पोलीस स्टेशनमध्ये अधिकारी उपस्थित राहून परिस्थितीवर नियंत्रण ठेवत होते.

या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली असून काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.सदर माहिती प्राथमिक स्वरूपाची असून, पुढील तपासानंतर अधिक तपशील समोर येणार आहेत.

## प्राप्तिकर चोरीच्या संशयावरुन बुलढाण्यात १०५० पोलीस कर्मचाऱ्यांना नोटीस

### सीएच्या मदतीने बनावट गुंतवणूक दाखवत मिळवली कर कपात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा पोलीस दलात आयकर विभागाच्या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली आहे. गेल्या तीन-चार वर्षातील आयकर रिटर्न्समध्ये बोगस कपाती दाखवून कर चोरी केल्याच्या संशयावरून तब्बल १०५० हून अधिक पोलीस कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. आयकर विभागानं थेट बुलढाणा पोलीस अधीक्षक कार्यालयाला पत्र पाठवलं आहे.

आयकर विभागानं पोलीस अधीक्षकांना पाठविलेल्या पत्रानुसार अनेक पोलीस कर्मचाऱ्यांनी कलम ८० सी आणि गृहकर्जावरील व्याज सवलतीच्या अंतर्गत बनावट गुंतवणूक दाखवत कर कपात मिळवली. प्रत्यक्षात विमा, पीपीएफ, म्युच्युअल फंड किंवा गृह कर्ज नसतानाही मोठ्या रकमेच्या कपाती दाखवल्या गेल्या आहेत.

**आयकर आयुक्तांच्या पत्रामुळे प्रकरण समोर आलं :** हे प्रकरण २३ ऑक्टोबर २०२५ रोजी नागपूरच्या सहाय्यक आयकर आयुक्तांनी पाठवलेल्या पत्रामुळे समोर आलं. या पत्रातील दाव्यानुसार आयकर सर्व्हेमध्ये बोगस रिटर्न्स दाखल केल्याचं निष्पन्न झालं आहे. आयकर विभागाच्या यादीत एकूण १६३३ नावं समाविष्ट आहेत. या यादीत २०२२ ते २०२५ या कालावधीतील आयकर रिटर्न्सचा समावेश आहे. त्यातील काही नावं वारंवार आढळली आहेत.

**आयकर रिटर्न दाखल करा- पोलीस अधीक्षक :** बुलढाणा जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांनी ६ नोव्हेंबर रोजी वायरलेस संदेशाद्वारे सर्व कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या आहेत की, १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत संशोधित आयकर रिटर्न दाखल करावं. अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल. जर बोगस दावे सिद्ध झाले तर संबंधित व्यक्तींना करासह व्याज आणि दंड भरावा लागेल.

पोलीस अधीक्षकांनी या सर्व प्रकरणाचा तपास सुरू केला असून, कर्मचाऱ्यांना रिटर्न्स सुधारण्याचे आदेश दिले आहेत. जिल्हा पोलीस दलात तणावाचं वातावरण असून, ही कारवाई आयकर विभागाच्या डेटा-ड्रिव्हन तपासणीचा भाग आहे. याप्रकरणी आणखी किती खुलासे होतात? किती कर्मचारी प्रभावित होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे. आयकर विभागाकडून नोटीस किंवा दंड आल्यास संबंधितांवर विभागीय कारवाई होऊ शकते. आता पुढे नेमकी काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.

### बारावीतली विद्यार्थिनी पडली रिक्षाचालकाच्या प्रेमात, मग असे झाले की..

**नागपूर/प्रतिनिधी :** प्रेम आंधळे असते असे म्हणतात. त्यामुळेच प्रेमात बुडालेल्या व्यक्तींना वय आणि समाजाने घालून दिलेल्या नैतिक बंधकांनेही भान रहात नाही. असाच काहीसा प्रकार मुख्यमंत्र्यांचे शहर असलेल्या उपराजधानीत उघडकीस आला. इयत्ता बाराव्या वर्गात शिकणारी विद्यार्थिनी चक्क आपल्याच घरी भाड्याने राहणाऱ्या ३५ वर्षीय विवाहित रिक्षाचालकाच्या प्रेमात वेडी झाली. भाड्याने राहणारा रिक्षाचालक विवाहित असल्याचे माहित असूनही ती त्याच्या प्रेमात कुटुंबाशी विद्रोह करण्यासही तयार होती. मात्र मुलगी अल्पवयीन असल्याने पोलिसांनी समजूत काढत तिला वस्तूस्थितीची जाणीव करून दिली आणि मुलीने संघर्ष मागे घेतला.

विशेष म्हणजे कुटुबियांना कसलीही कुणकुण न लागू देता दोघांचेही प्रेमसंबंध सुरु झाले होते. मात्र, ही बाब मुलीच्या आई मार्फत रिक्षाचालकाच्या पत्नीला कळली. या प्रकरणी विद्यार्थिनीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी मुलगी अल्पवयीन असल्याने रिक्षाचालकाविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करत त्याला अटक केली.

शांतीनगर पोलीस हद्दीत हद्दीत ही मुलगी आईवडिलांसह एका वस्तीत राहते. रिक्षाचालक नकुल तिच्या घरी भाड्याने खोली करून रहात आहे. लग्न झालेले असल्याने तो पत्नीसह येथे राहत होता. दरम्यान त्याची नजर घरमालकाच्या मुलीवर पडली. ही मुलगी बारावीच्या वर्गात शिकते.

तिला कॉलेजला सोडण्याच्या बहाण्याने नकूल तिला घेऊन अनेकदा एकाच वेळी घरातून निघत होता. तसेच घरी कुणी नसताना हे दोघे एकमेकांना वेळ देऊ लागले. त्यामुळे दोघंची चांगली गट्टी जमली. त्याने तिचा मुलीचा भ्रमणदूरध्वनी क्रमांकही मिळवत तिच्याशी चॅटिंग सुरु केले. विवाहित असलेल्या रिक्षाचालकाने मुलीला पुरते प्रेमाच्या जाळ्यात ओढले.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांची कार्यवाही सुरळीत सुरु

### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे विजयसिंह देशमुख यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मराठा समाजातील बेरोजगार युवकांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत ''महामंडळाचे कामकाज बंद झाले आहे, व्याज परतावा थांबविण्यात आला आहे'' अशा प्रकारच्या निराधार अफवा काही व्यक्तींकडून सोशल मीडियासह विविध माध्यमांतून पसरवल्या जात आहेत. या अफवांना कोणतेही तथ्य नसून, महामंडळाचे नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याचे काम वगळता इतर रार्व कामकाज सुरळीतपणे सुरु असल्याची माहिती विजयसिंह देशमुख, व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या. यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली.

महामंडळाच्या वेब प्रणालीचे दि. १० ऑक्टोबर पासून अपग्रेडेशनचे काम हाती घेण्यात आले आहेत. त्यामध्ये वेब प्रणालीचे प्रलंबित होते ते पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत, महामंडळाने स्वतः हुन एलओआय व बँक सेक्शन या दोन सेवा अधिसुचित केल्या आहेत. या नुसार या सेवा १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत देण्याचे बंधन महामंडळाने स्वतः वर घालून घेतले आहे. याबाबत आवश्यक ते बदल वेब प्रणालीमध्ये करणे सुरु आहे. एजंटमार्फत लाभार्थ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबावी यासाठी म्हणून महामंडळाने केंद्रांद्वारे फक्त ७० रुपयांत सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी केला आहे. त्यास अनुषंगाने वेबप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे काम सुरु आहे. लाभार्थ्यांना महामंडळाच्या सर्व सेवा थेट मोबाईलद्वारे देता याव्यात म्हणून मोबाईल ॲप विकसित होत आहे. यासाठी वेवप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणे सुरु आहे.

राज्यात विविध ठिकाणी एजंटमार्फत लाभार्थ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्याने, सद्यस्थितीत नाशिक व अहमदनगरमध्ये संबंधितांवर फौजदारी गुन्हे नोंद केले गेले आहेत. असे प्रकार घडू नयेत यासाठी वेब प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे काम सुरु आहे. राष्ट्रीयकृत बँका सोबत बँक एकत्रीकरण सुरु असून, लाभार्थ्यांना सुरळीत व सहजपणे व्याज परतावा मिळणार आहे. चॅट जीपीटी स्मार्ट बोट प्रणाली विकसित करण्यात आली आहे, जी लाभार्थ्यांना महामंडळाच्या योजनांबाबत मार्गदर्शन व माहिती देईल. योजनांतर्गत काही असे व्यवसाय निदर्शनास आले आहेत की, त्यामधून अपेक्षित स्वयंरोजगारनिर्मिती होत नाही अशा व्यवसायांबाबतचा अंकेक्षणाबाबत योग्य निर्णय संचालक मंडळाच्या बैठकीत घेणे प्रस्तावित आहे. तसेष मराठा समाजातील युवकांसाठी नवीन व्यवसाय कसे निर्माण करता येऊ शकतील? ही बाब विचाराधीन आहे. लाभार्थ्यांसाठी ऑनलाईन वेबीनार च्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम देखील सुरु करण्यात आले आहे. यापूर्वी व्याज परताव्याकामी लाभार्थ्यांना एका वेळेस कमाल ३ क्लेम सादर करता येत होते. मात्र सद्यस्थितीत लाभार्थ्यांना एका वेळेस कमाल ६ क्लेम सादर करता येत आहेत. तरी कोणत्याही प्रकारच्या राजकीय, दिशाभूल करणाऱ्या किंवा अफवांवर आधारीत माहितीवर विश्वास ठेवू नये असेही श्री. देशमुख यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना; सहभागी होण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना यावर्षीच्या रबी हंगामासाठी राबविण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. सुधारित पिक विमा योजनामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होण्यासाठी रब्बी ज्वारीसाठी ३० नोव्हेंबर तर गहू, हरबरा कांद्यासाठी १५ डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या कृषी कार्यालयास संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयाचे तंत्र अधिकारी समृद्धी वांगसकर यांनी केले आहे.

जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी २०२५-२६ हंगामकरिता (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र धरून राबवण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून भारतीय कृषी विमा कंपनीची निवड करण्यात आली आहे.

**योजनचा उद्देश :** नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, कृषि क्षेत्रासाठी पतपुरवठ्यात सातत्य राखणे, उत्पादनातील जोखीम पासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबर अन्नसुरक्षा पिकांचे विविध कारण आणि कृषि क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ होण्यास मदत होईल.

**योजनेचे वैशिष्टे :** सदर योजना अधिसूचित पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल. योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे, अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे वैयक्तिक कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत भाडेकरार पिक विमा संकेत स्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. या योजनेअंतर्गत



शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामसाठी १.५० टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. या योजनेंतर्गत रब्बी २०२५-२६ हंगामकरिता १ वर्षासाठी सर्व अधिसुचित पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे.

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षापैकी सर्वाधिक उत्पादनाच्या पाच वर्षाची सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाईल. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे तसेच अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो प्रस्ताव रद्द करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य असेल. पिक विमा नुकसान भरपाईसाठी ई पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. बोगस पीकविमा प्रकरणात फौजदारी कार्यवाही करण्यात येईल. पीकविमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी केंद्रधारकास ४० रुपये मानधन केंद्र शासनाने निश्चित केले असून विमा कंपनीमार्फत सीएससी केंद्र धारकास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी केंद्रधारकास देऊ नये. योजनेअंतर्गत गहू, हरबरा व कांदा पिकांकरीता रब्बी हंगाम २०२५-२६ करिता पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त उत्पादनास ५० टक्के भारांकन देऊन विमा क्षेत्र घटकातील सरासरी उत्पादकता निश्चित करण्यात येईल.

योजने अंतर्गत रब्बी हंगामा करिता पीक पेरणी पासून काढणीपर्यतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पिक उत्पादनावर विपरीत परिणाम करणारे इतर बाबीमुळे हंगामाच्या शेवटी पीक कापणी प्रयोग आधारे किंवा तांत्रिक उत्पादन आधारे महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय राहील.

पिक निहाय शेतकरी हिस्सा विमा हप्ता दर प्रति हेक्टर गहूसाठी ४५० रुपये, हरबरा ४५० रुपये, रब्बी कांदा २२५ रुपये निश्चित केला आहे. अधिक माहितीसाठी https://pmfby.gov.in/ या वेबसाइटवर किंवा हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १४४४७ किंवा आपल्या नजीकच्या सीएससी केंद्र, कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.